बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव.

# प्रा. डॉ. छाया दिनेश जाधव.

# SYBA ECONOMICS

## Semister – III

# Choice Based Credit System & Semister System

## 2020-21

# सूक्ष्म अर्थशास्त्र

# (Micro Economics)

## सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याख्या ः

"सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे अर्थव्यवस्थेचे सूक्ष्मपणे अध्ययन करणारे शास्त्र होय."

केंब्रिज अर्थशास्त्रज्ञ मॉरिस डॉब

"सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे विशिष्ट उत्पादन संस्था, विशिष्ट कुटुंब, विशिष्ट किमती, मजुरी, उत्पन्न, विशिष्ट उद्योग, विशिष्ट वस्तूंचे इत्यादींचे अध्ययन होय."

के.ई.बोल्डिंग

# सूक्ष्म  अर्थशास्त्राचे स्वरूप

- विशिष्ट आर्थिक घटकांचा अभ्यास
- समतोलाचे भिन्न कारण
- आपोआप आर्थिक कल्याण
- परस्परावलंबनाचा अभाव
- बाजाराधिष्टीत अर्थव्यवस्था गृहीत
- विभाजनावर भर
- उत्पादनसाधनांचे आपोआप वितरण
- गृहीते
- अंश लक्षी आर्थिक प्रश्नांचा अभ्यास
- अंशिक समतोल

# सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती

## सूक्ष्म आर्थिक विश्लेषण

- मूल्यसिद्धांत
  - मागणीचा सिद्धान्त
  - खर्च व उत्पादन विषयक सिद्धान्त
- उत्पादन घटक किंमत निर्धारणाचे सिद्धान्त
  - वेतन
  - खंड
  - नफा
  - व्याज
- आर्थिक कल्याणाचे सिद्धान्त

# सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्व-

- स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी.
- कल्याणकारी अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी.
- उत्पन्नाच्या विभाजनाच्या अभ्यासासाठी.
- किंमत निश्चिती करण्यासाठी
- उत्पादन साधनांचे वितरण.
- करविषयक धोरण आखण्यासाठी.
- मार्गदर्शक म्हणून.
- अर्थव्यवस्थेची कार्य पद्धती समजण्यासाठी

# सूक्ष्म अर्थशास्त्राच्या मर्यादा

१. अवास्तव गृहीते
२. स्थूल आर्थिक घटक दुर्लक्षित
३. संपूर्ण अर्थव्यवस्थेचे चित्र उभे राहत नाही
४. निर्हस्तक्षेपाचा पुरस्कार
५. चलनी घटक दुर्लक्षित
६. उत्पादनवाढ दुर्लक्षित
७. परस्परावलंबन दुर्लक्षित
८. बाजारयंत्रणेला अवास्तव महत्त्व
९. उत्पन्नाचे आपोआप विभाजन विषमता निर्माण करते

सूक्ष्म अर्थशास्त्रीय विरोधाभास

काटकसरीचा विरोधाभास

वेतन कपातीचा विरोधाभास

# मूलभूत आर्थिक प्रश्न/समस्या

## व्याख्या

"जे आर्थिक प्रश्न प्रत्येक अर्थव्यवस्थेत मग ती भांडवलशाही असो किंवा समाजवादी अर्थव्यवस्था असो किंवा संमिश्र अर्थव्यवस्था असो, निर्माण होतात आणि या अर्थव्यवस्थांना ते प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना करावी लागते, त्या आर्थिक प्रश्नांना मूलभूत आर्थिक प्रश्न असे म्हणतात."

# मूलभूत आर्थिक प्रश्न□समस्या

- उत्पादनाची सर्व उपलब्ध साधने पूर्णपणे वापरली जात आहेत का □
- कोणत्या वस्तूचे आणि किती उत्पादन केले जाते □
- वस्तूंचे उत्पादन कसे केले जाते □
- उत्पादन साधनांचा कार्यक्षम वापर होतो का □
- अर्थव्यवस्थेची उत्पादन क्षमता वाढत आहे का □

# आर्थिक विश्लेषणाची साधने

- फलनात्मक संबध
- अनुसूची
- आलेख
- समीकरणे

# स्थिर आर्थिक बदलणारे घटक

स्थिर किंवा अचल आर्थिक घटक

चल किंवा बदलणारे आर्थिक घटक

स्वतंत्र चल

परतंत्र चल

अंतर्गत चल

बाह्य घटक

# Tools of Economics Analysis

“दोन किंवा दोनपेक्षा अधिक चल किंवा बदलणाऱ्या आर्थिक घटकांतील कार्यात्मक संबंधाला फलनात्मक संबंध असे म्हणतात. उदा. वस्तूची किंमत आणि ज्या वस्तूची मागणी यांच्यातील संबंध किंवा वस्तूची किंमत आणि वस्तूचा पुरवठा यांच्यातील फलनात्मक संबंध”

1) स्थिल चल
2) बदलणारे आर्थिक घटक
3) स्वतंत्र चल
4) परतंत्र चल
5) अंतर्गत चल
6) बाह्य चल

# फलनात्मक संबंधाचे किंवा फलनाचे प्रकार

1) धन (+) फलनात्मक संबंध - जेव्हा स्वतंत्र चल आणि परतंत्र चल यांच्यात एकाच दिशेने बदल होतात. तेव्हा त्या दोन्ही आर्थिक चलनामधील फलनात्मक संबंध धन स्वरूपाचा असतो. उदा. - पुरवठा फलन

2) ऋणात्मक (-) फलनात्मक संबंध - जेव्हा स्वतंत्र चल आणि परतंत्र चल यांच्यात विरूध्द स्वरूपाचा संबंध असतो तेव्हा त्याला ऋणात्मक फलनात्मक संबंध असे म्हणतात.

उदा. - मागणी फलन

3) रेषीय आणि अरेषीय फलने - रेषीय फलनात फलनात्मक संबंध दर्शविणाऱ्या रेषेवरील प्रत्येक बिंदूत वक्राचा उतार सारखाच असतो. उदा - उपभोग फलन

4) अरेषीय फलन - जेव्हा फलनात्मक संबंध दर्शविणाऱ्या वक्रावरील वेगवेगळ्या बिंदूत वक्राचा उतार भिन्न भिन्न असतो तेव्हा फलनात्मक संबंध दर्शविणारा वक्र सरळ रेषा येत नाही.

# अनुसूची

**अनुसुची** –

अनुसूची म्हणजे प्रश्नांची औपचारिक अथवा विशिष्ट विषयांची अनुक्रमानुसार बनविलेली यादी किंवा सुची होय.

उदा – मागणी अनुसूची, पुरवठा अनुसूची

| वैयक्तिक मागणी अनुसूची | |
|---|---|
| साखरेची किंमत प्रतिकिलो रूपये | साखरेची मागणी किलोमध्ये |
| 50 | 3 |
| 40 | 4 |
| 30 | 5 |
| 15 | 7 |
| 05 | 9 |

| साखर पुरवठा पत्रक | |
|---|---|
| साखरेची किंमत प्रतिकिलो रूपये | साखरेचा पुरवठा किलोमध्ये |
| 30 | 5 |
| 40 | 6 |
| 45 | 8 |
| 50 | 9 |
| 60 | 10 |

# आलेख

मोठ्या प्रमाणावरील संख्यात्मक माहिती स्पष्ट करण्यासाठी आलेखाचा आधार घेतला जातो. आलेखाच्या मदतीने दोन किंवा दोनपेक्षा अधिक चलांमधील संबंध दृश्यस्वरूपात स्पष्ट करता येतो. उदा. - भारतातील स्त्री पुरूष प्रमाण आलेख हे एक आर्थिक विश्लेषणाचे साधन आहे.

# समीकरण

समीकरण म्हणजे अशी माहिती की, ज्यात डाव्या व उजव्या बाजूस असलेले दोन शब्द समान असतात किंवा समीकरण म्हणजे दोन चलातील समानता दर्शविणारे विधान होय.

उदा - $5x - 2 = 3x + 8$

समीकरणाचा हेतू चलाची माहिती नसलेली मूल्ये शोधून काढणे हा असतो.